Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# भारतीय जनता पार्टी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्याशी संबंधित बातम्यांना दैनिक लोकमत व दैनिक सकाळ वृत्तपत्रांनी दिलेले स्थान: एक तौलनिक अभ्यास

**सतीश प्रकाश वागरे**
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी,
माध्यमशास्त्र संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड.
**प्रा. डॉ.बालाजी शिंदे**
मार्गदर्शक,
सहयोगी प्राध्यापक व वृत्तपत्रविद्या विभाग प्रमुख,
अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय,राणीसावरगाव,
ता. गंगाखेड जि. परभणी.

**सारांश**:

वृत्तपत्रे ही समाजाला दिशा देण्याचे काम करतात. त्यामुळे वृत्तपत्रांनी नेहमीच आपली स्वतःची प्रतिमा जपत कोणत्याही पक्षांच्या अधीन न राहता किंवा कोणत्याही पक्षाचा विशिष्ट अजेंडा न राबवता लोकशाहीस पूरक अशा प्रकारची निपक्षपाती भूमिका घ्यावी लागते. कारण वृत्तपत्रे ही लोकशाहीची मूलभूत आधारस्तंभ मानली जातात. त्यामुळे समाजामध्ये ज्या काही अनिष्ट प्रकार घडून येतात त्या संबंधात वेळोवेळी आवाज उठवूनही वृत्तपत्रांची पारदर्शी भूमिका राहिली पाहिजे. गतकाही दिवसापासून वृत्तपत्रे ही एखाद्या राजकीय पक्षांच्या वळचणीला जाऊन बसत असल्याने वृत्तपत्राची भूमिका न मांडता पक्षाच्या अधीन राहून पक्षपाती भूमिका मांडण्याचा प्रकार आज घडीला राजरोसपणे चालू आहे. त्यामुळे वृत्तपत्रांच्या भूमिकेवर शंका कुशंका निर्माण होताना दिसतात. अशातच दोन राष्ट्रीय पक्षांनी देशात सरकार स्थापित केलेली आहे त्यापैकी एक म्हणजे भारतीय जनता पार्टी आणि याआधी दीर्घकाळ सत्ता स्थापन करणारा दुसरा पक्ष म्हणजे राष्ट्रीय काँग्रेस होय. या दोन्ही पक्षाच्या संबंधित बातम्यांना प्रसिद्धी देण्यासाठी मराठीतील आघाडीची वृत्तपत्रे म्हणजे दैनिक लोकमत व दैनिक सकाळ दोन्ही वृत्तपत्रांनी संपूर्ण महिनाभरात आपल्या वृत्तपत्रातून दोन्ही पक्षांच्या संबंधित बातम्या देण्यासाठी कोणत्या प्रकारची भूमिका बजावली आहे ? देशात असणारे दोन्हीही राष्ट्रीय पक्ष अंगावरती तसेच कोणत्या पक्षाच्या भूमिकेला अधिक प्राध्यान्य दिलेले आहे? निर्धारित केलेल्या वृत्तपत्रातून राजकीय बातम्यांना दिलेल्या स्थानासंबंधितअभ्यास करण्यासाठी दोन्ही वृत्तपत्राच्या महिनाभरातील ३० अंकांची निवड करून त्यातील पहिल्या पृष्ठावरील राजकीय बातम्यांचे तुलनात्मक आशय विश्लेषण करून अंतिम निष्कर्ष काढून मराठीतील आघाडीची वृत्तपत्रे आणि देशातील दोन्ही राष्ट्रीय पक्षांच्या संदर्भात अभ्यास केला जाणार आहे .त्या दृष्टीने या शोधनिबंधाचे महत्त्व अधोरेखित करता येते.

**बीजसंज्ञा: लोकमत ,सकाळ, भारतीय जनता पार्टी, भारतीय काँग्रेस ,राजकीय पक्ष.**

**प्रस्तावना:** देशाच्या सक्रिय राजकारणात अति सामान्य जनतेचा अपवादात्मक रित्याच आढळून येतो; पण राजकारण आणि राजकारणातील संबंधित विषयावर चर्चा विमर्श हे दैनंदिन घडत असते. त्यामुळे राजकीय वर्तुळात घडणाऱ्या घटनांकडे सामान्य जनता लक्ष ठेवूनच असते. अशा या राजकीय बातम्यांच्या संबंधित वृत्तपत्र आणि वृत्तपत्राची पारदर्शी भूमिका यामध्ये दिवसेंदिवस अविश्वासहार्यता आढळून येत आहे. त्यामुळे वृत्तपत्रे निपक्षपाती

भूमिका बजावतात काय हा प्रश्न प्रसार माध्यमांच्या बाबतीत  निर्माण झालेला आहे. त्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेत लोकशाहीचा आधारच पक्ष नसेल तर लोकशाहीतील अन्य स्तंभालाही तडा जाऊ शकेल हे नाकारता येणार नाही.  म्हणून वृत्तपत्रांच्या आणि एकंदरीत प्रसार माध्यमांच्या भूमिकेचा अभ्यास हा संशोधनात्मक अभ्यास ठरू शकतो. कारण लोकशाही आणि प्रसारमाध्यम यांच्यामध्ये समन्वय राहून समाजातील एकाधिकारशाही किंवा सत्ताधिकाराची शासन व्यवस्था बळावत जाऊन सर्वसामान्य जनता नेण्यापासून दुरावू शकते . म्हणून कोणत्याही शासन व्यवस्थेमध्ये या पक्षाची भूमिका आणि पक्ष केंद्रित वार्तांकन हा प्रसार माध्यमाच्या बाबतीत एक प्रकारचे अधर्म होऊ शकेल.  म्हणून गत काही वर्षांमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्ष आणि भारतीय जनता पक्ष या दोन्ही पक्षांनी देशात सत्ता स्थापन करून आपले सरकार चालले आहे .  अशा या राजकीय पक्षांच्या संबंधित संबंधित अनेक बातम्या प्रसारमाध्यमातून धुमाकूळ गाजवत असतात ; पण त्या बातम्या खरोखरच पारदर्शकपणे प्रसारित केल्या जातात का किंवा त्या बातम्यांमध्ये वर्तमान स्थिती विराजमान असणाऱ्या राजकीय पक्षांच्या संबंधित वार्तांकनाला अधिक प्रधान्य देऊन बाजू मांडण्याचे प्रकार आठवतात काय हा प्रकार महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे वर्तमानपत्रातून सत्ताधाऱ्यांना अनुकूल ठरणाऱ्या बातम्या प्रसारित करण्यात वृत्तपत्रे धन्यता मानतात की,  वर्तमान राजकीय पक्षापेक्षा बातमी मूल्य यावर भर देतात . यासाठी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये दैनिक लोकमत व दैनिक सकाळ या वृत्तपत्रांची निवड करून त्यातील महिनाभरातील वार्तांकनाचा अभ्यास करत असताना राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या दोन्ही राष्ट्रीय पक्षांच्या संबंधित वार्तांकनाचा अभ्यास महत्त्वाचा ठरणार आहे.

**भारतातील वृत्तपत्रांचा इतिहास व विकास**

भारतीय वृत्तपत्रांच्या इतिहासातील पहीली नोंद म्हणजे "भारतातील पहिले इंग्रजी वृत्तपत्र कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर किंवा बेंगॉल गॅझेट हे कलकत्ता येथे २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्टस हिकी या ब्रिटीश व्यक्तीने सुरू केले. ते हिकीज बेंगॉल गॅझेट म्हणूनही ओळखले जाते. कंपनी सरकारशी संघर्ष सुरू झाल्यावर त्याने वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुरस्कार केला व अशा प्रकारचे स्वातंत्र्य समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे, असेही म्हटले. कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या खाजगी भानगडींना वाचा फोडावयाची, हाच हिकीचा प्रमुख खटाटोप होता. त्यातूनच कटकटी निर्माण झाल्या व टपालातून त्याचे साप्ताहिक पाठविण्याची त्याची सवलत रद्द झाली. तसेच एकदोनदा त्यास दंड होऊन शिक्षाही भोगावी लागली." १७८० सालात बी. मेसिन्क व पीटर रीड यांनी इंडिया गॅझेट (कलकता अॅ‍ॅड्व्हर्टायझर) हे साप्ताहिक सुरू केले.मद्रासमधील पहिले इंग्रजी वृत्तपत्र मद्रास कुरिअर हे होय. ते १७८५ साली रिचर्ड जॉन्सन या सरकारी मुद्रकाने चालू केले. त्यात प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी जाहिरातींना कायदेशीरपणाचा दर्जा खास हुकुमाने देण्यात आला होता.'मुंबईतील पहिले नियतकालिक बॉम्बे हेरल्ड १७८९ मध्ये सुरू झाले. १७९१ मध्ये बॉम्बे गॅझेट प्रकाशित झाले. प्रारंभापासून त्याला राजाश्रय मिळाला होता. पुढच्याच वर्षी बॉम्बे हेरल्ड त्यात विलीन झाले. बॉम्बे गॅझेट १९१४ पर्यंत चालू होते. १७९२ साली बॉम्बे कुरीअरचा जन्म झाला. त्यात देशी भाषातून जाहिराती प्रसिद्ध होत, मोडी लिपीतही काही जाहिराती प्रकाशित झाल्या. अँग्लो इंडियन वृत्तपत्रे प्रमुख राज्यांच्या राजधान्यातून प्रसिद्ध होत. स्टेटस्मन (कलकत्ता), मद्रास मेल (मद्रास), टाईम्स ऑफ इंडिया (मुंबई), पायोनियर (अलाहाबाद), सिव्हील अँड मिलीयी गॅझेट (लाहोर) इ. त्या काळापासून प्रमुख अँग्लो इंडियन होती. स्टेट्समन हे वृत्तपत्र रॉबर्ट नाईट यांनी कलकत्ता १८७५ पासून चालू केले. यानंतर भारतीयांच्या मालकीची वृत्तपत्रे

हळूहळू निघू लागली. बंगालमधील बंगाली व अमृतमधील अझार पत्रिका हे त्यापैकी अग्रेसर होत. त्यांच्या मागोमाग फॉवर्ड, लिबर्टी, ऍडव्हान्स ही दैनिके त्या प्रांतात निघाली. कलकत्याला हिंदुस्तान स्टैंडर्ड हे दैनिक सुरू झाले. या प्रकारच्या दैनिकात मद्रासच्या हिंदूचे स्थान महत्वाचे आहे. २० सप्टेंबर १८७८ रोजी हिंदु साप्ताहिक स्वरूपात सुरू झाले. जी. सुब्रहम्ण्यूम अय्यर त्याचे संस्थापक होत. कालांतराने हिंदुचे कार्यालय मद्रासच्या कार्याचे केंद्र बनले. १८८९ पासून हिंदू हे दैनिक रूपात प्रसिद्ध होऊ लागले." अशाप्रकारचे स्वरूप भारतीय वृत्तपत्रांच्या इतिहासातील दिसून येते.

**राजकीय पक्ष आणि वृत्तपत्रांचा अंतरसंबंध :**

वृत्तपत्रे ही प्रसार माध्यमाचे काम करत असतात त्यामुळे प्रसारणाच्या या कार्यात सामाजिक, साहित्य, कृषी, प्रशासन ,संस्कृती , बाजार याबरोबरच राजकीय माहितीचे प्रसारण करणे हेही महत्त्वाचे कार्य वृत्तपत्राकडून घडून येते. त्यामुळे राजकीय पक्ष आणि वृत्तपत्राचा अंतर संबंध प्रत्यक्षात पहावयास मिळतो. ज्या पद्धतीने वृत्तपत्राला लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून संबोधले जाते. त्याचप्रमाणे वृत्तपत्रे ही लोकशाहीचे संवर्धन करणारी आधारस्तंभ असल्याने त्यांनी आपल्या मुख्य भूमिकेतून राजकीय पक्षाच्या संबंधित बातम्या आणि भूमिका यामध्ये निपक्षपाती भूमिका बजावणे गरजेचे असते. तरच खऱ्या अर्थाने लोकशाहीस समृद्ध होण्यास मदत होते. राजकीय व्यवस्थेमध्ये केवळ कायदेमंडळांसारख्या सरकारी संस्थाच नव्हे तर न्यायालये आणि प्रशासकीय संस्थांचाही समावेश होत असतो. त्यामुळे केवळ राजकीय संरचनाच नाही तर राजकीय पैलूंमध्ये सर्व संरचनांचा समावेश आहे. शिवाय, राजकीय पक्ष, हितसंबंध गट आणि माध्यमे या चौकटीत समाविष्ट आहेत. संवाद हा राजकीय व्यवस्थेला गतिमानता प्रदान करतो. प्राथमिक संवाद माध्यम असलेल्या वर्तमानपत्रांनी गतिमानतेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि विविध देशांमध्ये लोकशाही प्रक्रियेच्या प्रगती आणि स्थिरतेत योगदान दिले; परंतु बदलत्या काळानुसार, माध्यमे आणि राजकारण यांच्यातील संबंध बदलत असल्याचे दिसून येते.

लोकशाहीच्या मुक्त संचारासाठी प्रसार माध्यमावर कुठल्याही प्रकारचे राजकीय अंकुश असणे किंवा राजकीय पक्ष आणि सत्ताधाऱ्यांच्या कोणत्याही प्रकारच्या दबाव तंत्राचा वापर होता कामा नये. पण भारतीय समाज व्यवस्थेत मागील दशकापासून प्रसार माध्यमावर अंकुश ठेवून सत्ताधाऱ्यांच्या अधीन प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य बंदिस्त करण्याचे प्रकार राजरोसपणे चालू आहेत. त्यामुळे प्रसार माध्यमांच्या आणि एकूणच भारतीय समाज व्यवस्थेतील लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा स्थितीत प्रसार माध्यमे ही आपले कार्य निडरपणे निपक्षपातीपणे पारदर्शी भूमिका ठेवू शकत नाहीत. त्यामुळे या राजकीय दबाव तंत्राच्या बाबतीत डॉ. सवई एम.के. व विजय किसन शेळके आपल्या संशोधनात म्हणतात की, "प्रसार माध्यमावर एक राजकीय दबाव राजकीय बंधन हे राजकारणी त्यांचे त्यांच्या सोयीनुसार त्यांच्या-त्यांच्या गरजेनुसार ज्या बातम्या त्यांना अपेक्षित आहेत, त्याच प्रक्षेपित करणे अथवा त्याच बातम्यांना प्रसिद्धी देणे हे त्यांच्या हातचे बाहुले होऊन गेलेले आहे. असे सद्यस्थितीमध्ये आढळून येते. प्रसार माध्यमांमध्ये काम करताना निरपेक्ष काम करणाऱ्या वर्तमानपत्र बातमी संकलन संकलन करणाऱ्या वार्ताहराची गोची होते. त्यामध्ये वास्तव स्थिती जनतेसमोर मांडताना त्यांना त्या बातम्या त्यांच्या विशिष्ट अधिकाऱ्यांच्या नजरेतून घातल्याशिवाय त्यांना खरी प्रसिद्धी द्यायची की नाही हे ते ठरवत असतात. वर्तमानपत्रांमध्ये विषय निवडण्याचा अधिकारसुद्धा वर्तमानपत्राच्या एखाद्या ठराविक व्यक्तीला दिलेला असतो. त्यामुळे वर्तमानपत्राला

लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असे म्हटले जाते ते सत्य ते मध्ये उतरताना मात्र अवजड होऊन जाते. राजकारणी हे एखाद्या सत्ताधारी पक्षाच्या वर्चस्वाखाली असल्याने आपल्या वर्तमानपत्रातून कोणत्या बातम्या प्रसिद्ध कराव्यात याबाबत राजकीय दबाव तंत्र त्या ठिकाणी वापरले जाते. त्यावेळी वर्तमानपत्राचे मुख्य संपादक उपसंपादक अथवा वर्तमानपत्राचे मालक यांना सुद्धा बऱ्याचशा न्याय हक्काला तिलांजली द्यावी लागते." एकंदरीत वृत्तपत्रे आणि राजकीय पक्ष यांचा जवळचा अंतरसंबंध असला तरीही राजकीय दबाव तंत्र ही वृत्तपत्राच्या सामाजिक न्यायाच्या भूमिकेवर अंकुश ठेवून त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेत असल्याने वृत्तपत्रात बरोबरच लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होताना दिवसेंदिवस दिसून येते.

**दैनिक लोकमत :**

लोकमतच्या इतिहासात स्वातंत्र्य लढ्याची पार्श्वभूमी आहे. १९१८ मध्ये लोकमान्य टिळक बवतमाळला आले होते. त्यावेळी त्यांनी लोकनायक बापुजी अणे यांना लोकमत साप्ताहिक काढण्याची सूचना केली. लोकनायक बापूजी अणे यांनी लोकमत सामाहिक १९९८९ ला सुरू करून १९३३ पर्यंत चालवले. त्यांनी स्वातंत्र्य लढ्यास चेतना निर्माण करण्याचे कार्य वा साप्ताहिकाच्या माध्यमातून केले. जंगल सत्यागृह काळात हे साप्ताहिक बंद पडले. बंद पडलेले साप्राहिक सुरू करण्याचा विचार स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या मनात आला. त्यांनी स्वातंत्र्यांनंतर स्वराज्य स्थापनेच्या स्वप्नांसाठी १९५३ मध्ये लोकमत साप्ताहिकाला नवा जन्म दिला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी १९६० पर्यंत लोकमत साप्ताहिक स्वरूपात सुरू ठेवली. १९६० त्याचे द्विसाप्ताहिकात रूपांतर केले.  १९७१ लोकमत नागपूरहून दैनिक स्वरूपात सुरू केला. (स्व.) जवाहरलाल दर्डा यांनी लावलेल्या छोट्या रोपट्याचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झालेले आढळून येते.

१५ डिसेंबर १९७१ रोजी नागपूर येथून लोकमतची पहिली आवृत्ती सुरू झाली. १९७७ मध्ये खानदेश (जळगाव) आवृत्तीस प्रारंभ झाला. ९ जानेवारी १९८२ रोजी औरंगाबाद येथे छपाई प्रारंभ होऊन लोकमतने मराठवाड्यात पाऊल ठेवले. ३० मार्च १९८७ रोजी लोकमत टाइम्सच्या माध्यमातून लोकमतने इंग्रजी पत्रकारितेतही प्रवेश केला. १५ ऑगस्ट १९८७ रोजी नगर आवृत्तीस प्रारंभ झाला. १४ जानेवारी १९८९ रोजी नागपूरहून लोकमत समाचार हे राष्ट्रभाषा हिंदीतून दैनिक सुरू केले. २५ ऑक्टोबर १९९३ रोजी लोकमतच्या सोलापूर आवृत्तीचा प्रारंभ झाला. २० एप्रिल १९९६ रोजी नाशिक आवृत्तीची सुरुवात झाली. १६ मार्च १९९८ रोजी मुंबई आवृत्तीही सुरू झाली. २ जुलै १९९८ पासून लोकमतच्या मराठी आवृत्तीची स्वतंत्र वेबसाईट सुरू होऊन जगभरातील वाचकांसाठी ती उपलब्ध झाली. १२ ऑक्टोबर १९९८ रोजी कोल्हापूर आवृत्तीचे प्रकाशन झाले. १३ सप्टेंबर १९९९ रोजी पुण्यातून लोकमत आवृत्तींचा प्रारंभ झाला. अऑक्टोबर २००५ पासून लोकमतच्या सर्व आवृत्त्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपात (ई.पेपर) सुरू झाल्या. जगभरातील वाचकांसाठी इंटरनेटच्या माध्यमातून तो जगभर पोहचला. २१ एप्रिल २००९ रोजी गोवा आवृती सुरू झाली. आज इंटरनेटसह १४ आवृत्यांच्या माध्यमातून लोकमतने मराठी जनतेच्या हृदयात स्थान मिळविले आहे. अशा प्रकारे लोकमत या वृत्तपत्राचे मराठी वृत्तपत्रांच्या कारकिर्दीत महत्वाचे स्थान असल्याने त्याची पार्श्वभूमी थोडक्यात स्पष्ट करता येते.

**दैनिक सकाळ :**

१२ जानेवारी १९३२ रोजी 'सकाळ' चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. मराठी वृत्तपत्राच्या कारकीर्दीमध्ये महत्त्वाचे आणि महाराष्ट्रातील अग्रगण्य असणारे असणारे म्हणून दैनिक सकाळ या वृत्तपत्राचा उल्लेख होतो. 'सकाळ' च्या जन्माअधीच सकाळच्या काळामध्ये लोकांना सहभागी करून घेण्यासाठी स्पर्धा घेण्यात आली होती. यामध्ये १२०० लोकांनी ४००० नावे सुचवली होती. त्यातील फर्ग्यूसन महाविद्यालयाच्या विद्यार्थी काशिनाथ लक्ष्मण भिडे या विद्याध्यनि 'सकाळ' हे नाव सुचवले होते. तेच नाव नानासाहेब परूळेकर यांनी निश्चित केले. १ जानेवारी १९३२ रोजी त्यांनी सकाळचा पहिला अंक प्रसिद्ध केला. पुण्यातून प्रसिद्ध होणारा सकाळ १२ डिसेंबर १९७० पासून मुंबई सकाळ या नावाने प्रसिद्ध होऊ लागला. त्यानंतर १ ऑगस्ट १९८० पासून कोल्हापूरात सकाळत्री आवृत्ती सुरू झाली. १९८५ मध्ये श्री. प्रतापराव पवार यांनी हाती सुत्रे घेतल्यानंतर त्याचा विस्तार अधिक वेगाने झाला. १७ मार्च १९८९ मध्ये सकोळची नाशिक आवृत्ती सुरू झाली. आणि २८ जानेवारी १९९५ मध्ये मुंबई सकाळचे रूपांतर सकाळमध्ये करण्यात आले. १ जून १९९९ ला औरंगाबाद मधून सकाळ सुरू झाला. १ नोव्हेंबर २००१ ला सोलापूरातून १० मार्च २००३ ला नागपूर, १ जून २००३ ला सातारा, ११ ऑगस्ट २००४ पासून जळगावची आवृत्ती सुरू झाली. सकाळचे संस्थापक संपादक नानासाहेब परूळेकर यांनी अमेरिकेत पत्रकारितेचे शिक्षण घेतले होते. तेथील विविध वृत्तपत्रांचा अभ्यास आणि इंग्रजी वृत्तपत्रात त्यांनी लेखनही केले होते. महाराष्ट्रात येऊन येथील मराठी इंग्रजी वृत्तपत्रांचाही त्यांनी अभ्यास केला. त्यावेळी येथील वृत्तपत्रे बहुतांशी मतपत्रे स्वरूपात होती. येथील जनतेला रोज नव्या, ताज्या बातम्या वाचायला मिळाव्यात, त्यांचे प्रबोधन व्हावे, वाचनातून मनोजरंजन व्हावे, लोकशिक्षण व्हावे म्हणून त्यांनी सकाळची सुरुवात केली. अशाप्रकारे दैनिक सकाळ हे एक महत्त्वाचे मराठी वृत्तपत्र असून संपूर्ण महाराष्ट्रभरातून प्रसिद्ध होणाऱ्या या दैनिकाचा वाचक वर्ग अधिक प्रमाणात दिसून येतो एकंदरीत मराठी वर्तपत्राच्या यादीमध्ये दैनिक सकाळ या वृत्तपत्राचे महत्त्वाचे नाव आहे.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस:**

देशातील सर्वात जुना राजकीय पक्ष म्हणून काँग्रेस पक्षाची ओळख आहे. २८ डिसेंबर १८८५ रोजी ब्रिटिश राजवटीत काँग्रेसची स्थापना झाली. एलेन ओक्टेवियन ह्यूम, दादाभाई नौरोजी आणि दिनशा वाचा यांच्यासह संपूर्ण देशभरातील ७२ प्रतिनिधी मुंबईच्या तेजपाल संस्कृत पाठशाळेत एकत्र आले. आणि २८ डिसेंबर १८८५ रोजी 'इंडियन नॅशनल काँग्रेस' म्हणजेच राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. खरे तर, राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन पुण्यात पार पडणार होते; पण त्यावेळी पुण्यात प्लेगची साथ सुरू असल्या कारणाने तेच अधिवेशन मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत पार पडले. कलकत्त्याचे (सध्या कोलकाता) ख्यातनाम वकील उमेशचंद्र बॅनर्जी हे राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. काँग्रेस म्हणजे संघटना. शब्दाच्या अर्थानुसारच राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून सरकार आणि जनता यामध्ये संवादाला सुरुवात झाली. सुरुवातीला राष्ट्रीय काँग्रेसची धुरा मवाळ गटाने सांभाळली. पण पुढे १९०६ ते १९१९ या कालावधीत जहाल गटाने काँग्रेसचे नेतृत्व केले. त्यानंतर १९२० ते १९४७ या महत्त्वाच्या

कालावधीत महात्मा गांधी यांनी काँग्रेसचे नेतृत्व केले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात जन्माला आलेल्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात मोलाची कामगिरी बजावली. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून देशाला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म्हणजेच १९४७ पर्यंत राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तब्बल १.५ कोटींपेक्षा जास्त सदस्य होते. सदस्य आणि भारतीय जनतेचा पाठिंबा यामुळे राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा ब्रिटिश वसाहती शासनाच्या विरोधात एक केंद्रीय भागीदार बनला होता. देशाच्या स्वातंत्र्यानंतरही आज तब्बल ७० वर्षांनंतरही या पक्षाची देशातील महत्त्वाच्या राजकीय पक्षांमध्ये गणना होते. काँग्रेसला गांधी आणि नेहरू घराण्याची मोठी परंपरा लाभली आहे. काँग्रेसचे निष्ठावान अनुयायी पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. महात्मा गांधींसोबत त्यांनीसुद्धा देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले. राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी बजावलेली भूमिका सुद्धा मोलाची होती. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात त्यांनी पंचशील करार, अलिप्ततावाद यांसारख्या महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय धोरणांचे त्यांनी समर्थन केले. एवढेच नाही तर देशाच्या प्रगतीसाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी कृषी, औद्योगिक, संशोधन या घटकांना प्राधान्य दिले. पंचवार्षिक योजना ही त्यांनीच देशाला दिलेली देणगी आहे. जवळपास सव्वाशे वर्षे जुन्या असलेल्या राष्ट्रीय काँग्रेस पक्षाला अनेक स्थित्यंतरातून जावे लागले. वाढती बेरोजगारी, देशांतर्गत घडामोडी, पक्षीय राजकारण यांसारख्या अनेक समस्या काँग्रेस समोर होत्या. १९५४ मध्ये आवडी येथे काँग्रेसचे अधिवेशन पार पडले. यामध्ये समाजवादानुसार समाजरचना हे जवळचे उद्दिष्ट जाहीर करण्यात आले. त्यानुसार मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण, जमीनमालकी हक्कांमध्ये सुधारणा थोडक्यात कसेल त्याची जमीन, आयात-निर्यात व्यापाराचे तारतम्य राखून राष्ट्रीयीकरण असा दहा कलमी कार्यक्रम त्या अधिवेशनात मान्य करण्यात आला. पण या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत अडचणी येऊ लागल्या. १९६९ साली राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांचे निधन झाले. त्यावेळी राष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकी संदर्भात काँग्रेसमध्ये दुफळी निर्माण झाली. मोरारजी देसाई, निजलिंगप्पा यांसारखे जुने नेते आणि इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण हे नवे नेते यांमधील मतभेद चव्हाट्यावर आले. नोव्हेंबर १९६९ मध्ये काँग्रेसचे अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली. त्यामुळे काँग्रेस दुभंगली. त्यानुसार निजलिंगप्पांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचा उल्लेख संघटना तसेच जुनी काँग्रेस आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसचा उल्लेख आय काँग्रेस असा करण्यात येऊ लागला. १९७१च्या संसदेच्या मध्यावधी निवडणुकीत नव्या काँग्रेसला २/३ पेक्षा अधिक जागांवर विजय मिळाला. या निवडणुकीत संघटना काँग्रेसला १६ जागाच जिंकता आल्या. बहुमत मिळाल्याने इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार स्थापन झाले. त्यानंतर नोव्हेंबर १९७१ मध्ये सुप्रीम कोर्टाने नव काँग्रेसला अधिकृत काँग्रेस म्हणून मान्यता दिली." अशाप्रकारे भारतीय काँग्रेस पक्षाची थोडक्यात पार्श्वभूमी मांडता येते.

**भारतीय जनता पार्टी**

भारतीय जनता पक्ष हा भारतातील एक राष्ट्रीय राजकीय पक्ष आहे. या पक्षाची विचारधारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघासोबत संलग्न असून त्याची धोरणे उजवीकडे झुकणारी आहेत असे मानले जाते. २०१४ सालापासून संसदेच्या लोकसभा सभागृहामध्ये भाजपचे बहुमत असून विद्यमान भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भाजपचे सदस्य आहेत.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत परत भारतीय जनता पक्षाने बाजी मारली. महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला ४८ पैकी २३ जागा मिळाल्या. तसेच शिवसेना व भारतीय जनता पक्षाची युतीने ४८ पैकी ४२ जागी घवघवीत यश मिळवले. भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी हे वाराणसीतून निवडून आले आहेत.

भारतीय जनसंघ (१९५१-७७) १९५१ साली श्यामाप्रसाद मुखर्जी ह्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. जनसंघ हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राजकीय अंग मानले जात असे. काँग्रेस व तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू ह्यांच्याकडून पाकिस्तानचे होणारे लांगूलचालन रोखणे व भारतामधील हिंदूंचे हित जपणे ही जनसंघाची उद्दिष्टे होती. स्थापनेनंतर जम्मू आणि काश्मीर भारतामध्ये संपूर्ण सामावून घेतला जावा अशी आग्रही भूमिका जनसंघाने घेतली व ह्यादरम्यान निदर्शने करताना अटक झालेल्या मुखर्जी ह्यांचे काश्मीरच्या तुरुंगातच निधन झाले. दीनदयाल उपाध्याय व त्यानंतर अटलबिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी ह्या तरुण नेत्यांनी जनसंघाची सूत्रे हातात घेतली. १९५२ सालच्या पहिल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनसंघाला केवळ ३ जागांवर विजय मिळाला.

१९६७ सालच्या देशव्यापी विधानसभा निवडणुकांमध्ये जनसंघाने अनेक लहान प्रादेशिक पक्षांसोबत युती केली व मध्य प्रदेश, बिहार व उत्तर प्रदेश राज्यांमध्ये सरकारे स्थापन केली. युतीचे राजकारण करण्यासाठी जनसंघाला आपली अनेक कट्टर हिंदूवादी धोरणे व विचार बदलणे भाग पडले.

**जनता पार्टी (भारतीय जनसंघ) (१९७७-८०)**

१९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी लागू केलेल्या देशव्यापी आणीबाणीला जनसंघाने कडाक्याचा विरोध केला व जनसंघाच्या अनेक सदस्यांना तुरुंगात कोंडून ठेवण्यात आलं. १९७७ साली आणीबाणी उठल्यानंतर जनसंघाने भारतीय लोकदल, काँग्रेस (ओ), सोशालिस्ट पार्टी इत्यादी पक्षांसोबत एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना केली. जयप्रकाश नारायण, मोरारजी देसाई इत्यादी नेते जनता पक्षाचे सदस्य होते. १९७७ सालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये जनता पक्षाला प्रचंड बहुमत मिळाले व मोरारजी देसाई पंतप्रधान तर अटलबिहारी वाजपेयी परराष्ट्रमंत्री बनले. परंतु अंतर्गत कलहामुळे ग्रासलेले जनता पार्टी सरकार १९८० साली कोसळले व जनता पार्टीचे विघटन झाले.

**भारतीय जनता पार्टी(पक्ष) (१९८०-चालू)** जनता पार्टीच्या विघटनानंतर भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी पक्षाचे पहिले अध्यक्ष बनले. भाजपचा चेहरामोहरा जनसंघासारखाच होता.आज याच पक्षाचे सरकार देशभरात लागू असून विद्यमान काळातील एक मोठा राष्ट्रीय पक्ष म्हणून या पक्षाची वाटचाल गतीने सुरू आहे.

**उद्देश**

१) दैनिक लोकमत व दैनिक सकाळ वृत्तपत्रातील प्रथम पृष्ठावर राष्ट्रीय राजकीय

बातम्यांचा दिलेली स्थान अभ्यासणे

२) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी यांच्याशी संबंधित बातम्यांची तुलनात्मक अभ्यास करणे

**गृहितकृत्ये**

१) दैनिक लोकमत व दैनिक सकाळ वृत्तपत्रात राष्ट्रीय राजकीय पक्ष संबंधित बातम्या प्रथम पृष्ठावर प्रकाशित होतात

२) राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पार्टी या राजकीय पक्षाच्या संबंधित बातम्या सकाळ व दैनिक लोकमत वृत्तपत्रातून नियमित प्रकाशित होतात.

**भारतीय जनता पार्टी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्याशी संबंधित बातम्यांचे आशय विश्लेषण**

**संशोधनाचा कालावधी: १ मे २०२२ ते ३० मे २०२२**

**लोकमत**

**भारतीय जनता पार्टी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस यांच्याशी संबंधित बातम्यांना दैनिक लोकमत वृत्तपत्राने दिलेले स्थान**

पहिल्या एका पृष्ठाचे क्षेत्रफळ =५२×३३=१७१६ सेमी

एका महिन्याचे पहिल्या पृष्ठाचे  एकूण क्षेत्रफळ=- ५१४८० सेमी

एका महिन्याच्या अंकात पहिल्या पृष्ठावर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय काँग्रेस यांच्याशी संबंधित बातम्यांना  दिलेले स्थान

१) राष्ट्रीय काँग्रेस =४९७.५ सेमी

२)भारतीय जनता पार्टी=१९८ सेमी


राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी यांना दिलेले एकूण मुद्रित क्षेत्र =६९५.५ सेमी

एकूण अंक-३०

टक्केवारी    -१) राष्ट्रीय काँग्रेस - ०.९ %

२) भाजप - ०.३ %

काँग्रेस + भाजप एकूण टक्केवारी = १.३%




**सकाळ**

दैनिक सकाळ वृत्तपत्राने पहिल्या पृष्ठावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी या

राष्ट्रीय राजकीय बातम्यांना दिलेले स्थानः

पहिल्या एका पृष्ठाचे एका दिवसाचे क्षेत्रफळ =३३.५×५२= १७४२

एका महिन्याचे पहिल्या पृष्ठाचे एकूण क्षेत्रफळ = १७४२×३०= ५२२६० सेमी

एका महिनाभरात पहिल्या पृष्ठावर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय काँग्रेस यांच्याशी संबंधित

बातम्यांना सकाळ वृत्तपत्राने दिलेले एकूण मुद्रित क्षेत्र

१)राष्ट्रीय काँग्रेस = ७७२.७५ सेमी

२)भारतीय जनता पार्टी=११८०.७५ सेमी


राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी यांना दिलेले एकूण मुद्रित क्षेत्र = १९५३.५सेमी

एकूण अंक-३०

टक्केवारी -१) राष्ट्रीय काँग्रेस - १.५ %

२) भाजप - २.२

काँग्रेस + भाजप एकूण टक्केवारी - ३.७%




एकंदरीत वरील अभ्यासावरून असे आढळून येते की भारतीय जनता पार्टी व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या पक्षाशी संबंधित पहिल्या पृष्ठावर आपल्या वृत्तपत्रातून बातम्या प्रसिद्ध करण्यामध्ये मुख्यतः सकाळ वृत्तपत्राने भाजप या पक्षाशी संबंधित बातम्यांना अधिक प्राधान्यक्रम देऊन भाजप या पक्षाच्या संबंधित बातम्यांना अधिक स्थान  म्हणजेच २.२% दिल्याचे आढळून येते. तर सकाळ वृत्तपत्रातून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाशी संबंधित बातम्यांना अत्यल्प प्रमाणात स्थान दिल्याचे आढळून येते त्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या पक्षाला १.५ % इतके स्थान संपूर्ण महिनाभरात दिल्याचे आढळून येते.

**निष्कर्ष**:

१)   दैनिक लोकमत वृत्तपत्राने महिन्याभरात प्रथम पृष्ठावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी या पक्षाशी संबंधित बातम्यांना १.३% स्थान दिलेल्या आढळते

२)   दैनिक सकाळ वृत्तपत्राने  महिन्याभरात प्रथम पृष्ठावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व भारतीय जनता पार्टी या पक्षाशी संबंधित बातम्यांना ३.७ स्थान दिलेल्या आढळते.

३)   दैनिक लोकमत या वृत्तपत्राने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षास महिनाभराच्या प्रथम पृष्ठावर अधिक स्थान दिलेले आढळून येते

४)   दैनिक सकाळ वृत्तपत्रांनी भारतीय जनता पक्षास महिनाभराच्या प्रथम पृष्ठावर अधिक स्थान दिलेले आढळून येते

**संदर्भ:**

१)साने ,मा. वि. व इनामदार श्री.दे.(२००७) भारतातील इंग्रजी वृत्तपत्रे ,मराठी विश्वकोश खंड,१७,संपादित

वाड विजया, मुंबई, मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,पृष्ठ७५

२) डॉ. सवई एम.के. व विजय किसन शेळके, प्रसार माध्यमे आणि समाज, समाजशाख संशोधन पत्रिका, वर्ष ४१ वे,

अंक २९ डिसेंबर, २०२३

३) बाविस्कर विजय,लोकमत:लोकमान्य लोकनायक, सुवर्ण माहोत्सवी महाराष्ट्र वृत्तपत्र गौरव ग्रंथ, (सप्टेंबर २०२०) पृष्ठ -२१३

४) कात्रे श्रीकांत, काळाबरोबर धावणारा सकाळ माध्यम समूह,सुवर्णमहोत्सव गौरव ग्रंथ,(सप्टेंबर२०१०) पृष्ठ-१३८

५) https://www.mymahanagar.com/featured/foundation-of-congress-party/153119/

६)https://bjppadvidharprakoshta.com/%e0%a4%ad%e0%a4%be%e0%a4%b0%e0%a4%a4%e0%a5%80%e0%a4%af-%e0%a4%9c%e0%a4%a8%e0%a4%a4%e0%a4%be-%e0%a4%aa%e0%a4%95%e0%a5%8d%e0%a4%b7/

७) लोकमत अंक, १ मे २०२२ ते ३० मे २०२२

८) सकाळ अंक, १ मे २०२२ ते ३० मे २०२२